# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/मुनि/ A32231 /2014 दिनांक: 31/01/14

## परिपत्रक

**विषय : म. प्रा. व. न.र. अधिनियम 1966 च्या कलम 143 नुसार प्रशमन शुल्काची आकारणी करुन मऔविमची पूर्वपरवानगी न घेता केलेल्या परंतू वि.नि. नि. नुसार असलेल्या बांधकामासंबंधी गुन्हयाचे प्रशमन करणेबाबत.**

**संदर्भ :-** परिपत्रक क्र. MIDC/CP/C68271/2013 दि.10/09/2013 आणि MIDC/CP/D65197/2013 दि.28/11/2013.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावरील वि.नि.नि. नूसार असलेले परंतू वि.नि.प्रा. यांची पूर्वपरवानगी न घेता केलेले व त्यामुळे अनधिकृत ठरणारे बांधकाम करणाऱ्या उद्योजकांवर म. प्रा. व. न. र. अधिनियमातील तरतुदीनूसार कठोर व कटू कारवाई टाळण्याच्या हेतूने उक्त अधिनियमातील कलम 143 मधील तरतुदीनुसार गुन्हयाचे प्रशमन करण्यासाठी प्रशमन शुल्क (Compounding Charges) आकारणेबाबत संदर्भीय परिपत्रकानुसार निर्देश देण्यात आले होते. त्यातील तरतुदीनुसार आवश्यक तेवढया प्रशमन शुल्काची रक्कम आकारणेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता मिळण्याची प्रकरणे वि.नि.प्रा. यांचेकडून मुख्यालयास सादर करण्यात येतात. परंतू याप्रमाणे प्रशमन शुल्क (Compounding Charges) आकारु नये किंवा ही रक्कम कमी करावी अशा आशयाच्या निवेदनांच्या अनुषंगाने महामंडळाच्या दिनांक 07/01/2014 रोजी झालेल्या 354 व्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार संदर्भीय परिपत्रकामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

I) **<u>For construction of a building with substantial deviation from approved building plan (Only for industrial buildings)</u>**

A. **Compounding charges for the unauthorized construction on plots upto 1000 sq.m area** = 10 % X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate **(Subject to a minimum amount of Rs. 10,000/-)**

B. **Compounding charges for the unauthorized construction area upto 4000 sq.m** = 10 % X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate **(Subject to a minimum amount of Rs. 50,000/-)**

C. **Compounding charges for the unauthorized construction area above 4000 sq.m** = 10 % X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate **(Subject to a minimum amount of Rs. 1,00,000/-)**

II) **<u>For construction entirely done without any building permission (Only for industrial buildings)</u>**

A. **Compounding charges for the unauthorized construction on plots upto 1000 sq.m area** = 20% X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate. **(Subject to a minimum amount of Rs. 20,000/-)**

B. **Compounding charges for the unauthorized construction area upto 4000 sq.m** = 20% X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate **(Subject to a minimum amount of Rs. 1,00,000/-)**

C. **Compounding charges for the unauthorized construction area above 4000 sq.m** = 20% X Total area of unauthorized construction done without prior approval X Land rate **(Subject to a minimum amount of Rs. 2,00,000/-)**

वरीलप्रमाणे सुधारणा केलेले प्रशमन शुल्काचे(Compounding Charges) दर केवळ औद्योगिक वापराकरीता असतील. ज्या उद्योजकांनी अद्यापी प्रशमन शुल्क भरलेले नाही, त्यांनाही नवी आकारणी लागू राहील.

रहिवासी व व्यापारी प्रयोजनाकरीता मुळ तरतुद कायम राहील. तसेच संदर्भीय परिपत्रकानुसार प्रशमन शुल्क आकारणीची प्रकरणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी मुख्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, वि. नि. नि. नुसार असलेली परंतू वि.नि.प्रा. यांची पूर्वपरवानगी न घेता केलेली व त्यामुळे अनधिकृत ठरणारी बांधकामे प्रशमन शुल्काची आकारणी करुन नियमित करण्याचे अधिकार वि.नि.प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. सर्व संबंधितांनी याची नोंद घेवून अशी प्रकरणे आपल्या स्तरावर निकाली काढावीत.

सदर परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**मुख्य नियोजक**
**मऔविम, मुंबई-93.**

**प्रत :** मा. मु. का. अ., मऔविम यांना माहितीकरीता सादर.

**प्रत : माहितीकरीता अग्रेषित.**

1) सह. मु. का. अ., मऔविम

2) सह. मु. का. अ. (मावतं) मऔविम

**प्रत : माहिती व उचित कार्यवाहीकरीता.**

1) सर्व विभागप्रमुख, मऔविम.

2) सर्व कार्यालयीन प्रमुख, मऔविम.

3) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.

4) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.

5) सर्व वि.नि.प्रा., मऔविम.

6) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

7) सर्व औद्योगिक संघटना.

8) सुरक्षा नस्ती.